# नेत्रचिकित्सा शिबीर



## कांदळगावकर दाम्पत्याचा उपक्रम

। नेरळ । वार्ताहर ।

पनवेल येथील नेत्र चिकीत्सक डॉ.सुहास हळदीपुरकर यांचे लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट आणि नेरळ येथील नितीन कांदळगावकर- नम्रता कांदळगावकर यांच्या संयुक्त विद्यमाने १०१ वे नेत्रतपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. नेरळ येथील जेनी ट्यूलीप शाळेमध्ये आयोजित केलेल्या १०१ व्या शिबिराचे उद्‌घाटन भाजपचे रायगड जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे यांचे हस्ते झाले.

त्यावेळी आयोजक कांदळगावकर दांपत्य तसेच अनिल पटेल, अनिल जैन, डॉ. वृषाली पाटील आदी उपस्थित होते. या शिबिरात ८० रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली, त्यातील २३ रुग्णांना मोतीबिंदू दोष आढळल्याने त्यांच्या डोळ्यांवर शस्त्रक्रिया पनवेल येथे लक्ष्मी आय केअर मध्ये केली जाणार आहे. शिबिर यशस्वी होण्यासाठी मिलिंद कोशे, विकास अहिर, सखाराम कडाली यांनी तर रुग्णांची नेत्र चिकित्सा डॉ. वृषाली पाटील, तसेच श्वेताली आंग्रे, श्रुती गायकवाड,शिवाजी महाडिक,सृष्टी कुरुगले, विनोद पाचघरे, अंकुश साखरे, जितेंद्र जाधव यांनी केली.